कृपया प्रसिद्धीकरिता सादर
संपादक / वृत्तसंपादक
(signature) १७/१०/१६
(श्री हनुमंत गोफणे)
जनता संपर्क अधिकारी

**PRESS NOTE**
THE BRIHAN MUMBAI ELECTRIC SUPPLY & TRANSPORT UNDERTAKING
(Of The Brihan Mumbai Mahanagar Palika)
BEST Bhavan, Post Box No. 192,
Mumbai - 400 001.

बेस्ट
**प्रसिद्धी पत्रक**
बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम
(बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत)
बेस्ट भवन, पत्र पेटी क्र.१९२,
मुंबई - ४०० ००१.

प्रसिद्धी पत्रक क्र. ३९
दिनांक - १९/१०/२०१६

## दिव्यांग व्यक्तींना उपक्रमाच्या बसगाड्यांमधून – वातानुकूलित बससेवा वगळून - मोफत प्रवास सवलत

मुंबई - गुरुवार, दिनांक २०.१०.२०१६ पासून दिव्यांग व्यक्ती (दृष्टिहीन आणि ४०% व त्यापेक्षा अधिक अस्थिव्यंग अपंग) यांना बेस्ट उपक्रमाच्या बसगाड्यांमधून – **वातानुकूलित बससेवा वगळून** - मोफत प्रवास सवलत - योजना कार्यान्वित करण्यात येत आहे.

या योजनेची ठळक माहिती :

१) मोफत प्रवास सवलतीचा लाभ दृष्टिहीन आणि ४०% व त्यापेक्षा जास्त अस्थिव्यंग अपंग – दिव्यांग व्यक्तींना घेता येईल. ही सवलत बेस्ट उपक्रमाची बससेवा कार्यान्वित असलेल्या बृहन्मुंबई महापालिका परिसर तसेच लगतच्या शहरांमध्ये उपलब्ध राहील.

२) सवलतीच्या लाभार्थींना बेस्ट उपक्रमाचे RFID स्मार्टकार्ड / ओळखपत्र घेणे बंधनकारक आहे.

३) या योजनेचा लाभ घेऊ इच्छिणा-या दृष्टिहीन आणि ४०% व त्यापेक्षा जास्त अस्थिव्यंग अपंग – दिव्यांग व्यक्तींना त्यांच्या निवासस्थानाजवळील उपक्रमाच्या आगारात अथवा त्यांना सोयीस्कर असलेल्या कोणत्याही बसआगारातील वाहतूक विभागीय कार्यालयामध्ये जाऊन, बेस्ट उपक्रमाने विनाशुल्क उपलब्ध केलेले मुद्रीत प्रपत्र आवश्यक माहिती व प्रमाणपत्राच्या छायांकित प्रतीसह संबंधीत प्रशासकीय अधिका-याकडे / आगार अधिका-यांकडे रविवार व सार्वजनिक सुट्टी व्यतिरिक्त कार्यालयीन वेळेत (सकाळी ९.०० ते सायंकाळी १६.३० वाजेपर्यंत) सादर करणे आवश्यक आहे.

...२...

४) प्रशासकीय अधिका-याकडून प्रपत्र व आवश्यक कागदपत्रांची पडताळणी झाल्यावर संबंधीत दृष्टिहीन आणि ४०% व त्यापेक्षा जास्त अस्थिव्यंग अपंग – दिव्यांग व्यक्तींना नजिकच्या बसपास वितरण केंद्रावर नोंदणी व छायाचित्र काढण्याकरिता पाठविण्यात येईल. संबंधीत लाभार्थी प्रवाशांना RFID स्मार्टकार्ड / ओळखपत्रासाठीचे शुल्क रु.४०/- (फक्त सुरुवातीला) भरावे लागतील. नोंदणीच्या दिवसापासून ४ ते ७ कामजाच्या दिवसात RF-ID स्मार्टकार्ड संबंधित बसपास वितरण केंद्रामध्ये उपलब्ध करण्यात येईल.

५) दिव्यांग व्यक्तीकरीता असलेली ही मोफत प्रवासाची योजना कार्यान्वित झाल्यानंतर दृष्टिहीन व शारिरीक अपंगांकरीता सध्या अस्तित्वात असलेल्या सवलतीच्या प्रवासभाडयाच्या योजना रद्द करण्यात येतील.

सर्व दृष्टिहीन आणि ४०% व त्यापेक्षा जास्त अस्थिव्यंग अपंग – दिव्यांग प्रवाशांना आवाहन करण्यात येते की, त्यांनी बेस्ट उपक्रमाच्या बसगाड्यांमधून – (वातानुकूलित बससेवा वगळून) - उपलब्ध करण्यात आलेल्या मोफत प्रवास सवलतीचा जास्तीत-जास्त लाभ घ्यावा.

*************